**मे. एन.एन. ग्लोबल मरचेन्टाईल प्रायव्हेट लिमिटेड, खसरा क्रं. १३१/२, १३१/३, १३१/४, मौजा मुथारा, तालुका-राजुरा, जिल्हा-चंद्रपूर, महाराष्ट्र या प्रकल्पाच्या २.० एमटीपीए डिशल्ड कोल क्रशिंग प्रकल्पाचे २.० एमटीपीए वेट कोल वॉशरीच्या आधुनिकीकरणाच्या प्रकल्पाच्या प्रस्तावाबाबत पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृतांत -**

---

| | | |
|---|---|---|
| दिनांक | : | १६/११/२०२२ |
| वेळ | : | सकाळी १२:०० वाजता |
| स्थळ | : | प्रकल्प स्थळ, मे. एन. एन. ग्लोबल मरचेन्टाईल प्रायव्हेट लिमिटेड, खसरा क्रं. १३१/२, १३१/३, १३१/४, मौजा मुठरा, तालुका-राजुरा, जिल्हा-चंद्रपूर, महाराष्ट्र |

**प्रस्तावनाः-**

मे. एन. एन. ग्लोबल मरचेन्टाईल प्रायव्हेट लिमिटेड, खसरा क्रं. १३१/२, १३१/३, १३१/४, मौजा मुथारा, तालुका-राजुरा, जिल्हा-चंद्रपूर, महाराष्ट्र या प्रकल्पाच्या २.० एमटीपीए डिशल्ड कोल क्रशिंग प्रकल्पाचे २.० एमटीपीए वेट कोल वॉशरीच्या आधुनिकीकरणाच्या प्रकल्पाच्या पर्यावरणविषयक प्रस्तावाबाबत प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण अनुमती (Environment Clearance) प्राप्त करण्यासाठी आवश्यक असलेला प्रकल्प स्थानाच्या परिघातील १०.० कि.मी. परिघातील पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल (EIA) तयार करण्यासाठी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांनी टीओआर दिनांक १३ नोव्हेंबर, २०१९ रोजी मान्यता दिलेली आहे.

पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार प्रकल्प स्थानाच्या १० कि.मी. परिघातील पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत पर्यावरण जाहिर जनसुनावणी आयोजित करणे व त्यात प्रकल्पग्रस्त, स्थानिक लोक यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी उपस्थित केलेले पर्यावरणीय मुद्दे अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात समाविष्ट करण्याचे निर्देश दिले. तसेच सदरहू प्रकल्प हा अर्ज सादर करताना संवर्ग ए सेक्टर २ (ए) मध्ये मोडत होता व त्यास पर्यावरण अनुमती ही पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्याकडून प्राप्त करणे आवश्यक होते.

मात्र नवीनतम अधिसूचना दिनांक १२ एप्रिल, २०२२ नुसार ज्या प्रकल्पाची क्षमता ही २.५ एमटीपीए (कोल वॉशरी) पेक्षा कमी असेल, त्या प्रकल्पांना संवर्ग ब मध्ये अधिसूचित केल्याने सदरहू प्रकल्पाचा पर्यावरण अनुमतीसाठी अर्ज हा राज्य पर्यावरण प्रभाव मुल्यांकन प्राधिकरणास (SEIAA) सादर करण्यात येईल.

मे. एन. एन. ग्लोबल मरचेन्टाईल प्रायव्हेट लिमिटेड, खसरा क्रं. १३१/२, १३१/३, १३१/४, मौजा मुथारा, तालुका-राजुरा, जिल्हा-चंद्रपूर, महाराष्ट्र यांनी पर्यावरणविषयक जनसुनावणी

आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे दिनांक २९/०७/२०२२ अर्ज सादर केला. म.प्र.नि.मंडळ चंद्रपूर व जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्या समन्वयाने जिल्हाधिकारी चंद्रपूर, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक १६ नोव्हेंबर, २०२२ रोजी दुपारी १२ वाजता प्रत्यक्ष (physical) पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रकल्प स्थानावर आयोजित करण्यास मान्यता दिली त्याचप्रमाणे सदरहू जनसुनावणी ऑनलाईन घेण्याचीही सूचना केली.

पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बैठकीच्या ३० दिवस अगोदर जाहिर जनसुनावणीची सूचना एक स्थानिक वृत्तपत्रात स्थानिक भाषेत व एक राष्ट्रीय वृत्तपत्रात इंग्रजीमध्ये प्रकाशित करणे बंधनकारक असल्याने उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ चंद्रपूर यांनी स्थानिक वृत्तपत्र लोकमत यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र टाइम्स ऑफ इंडिया यात इंग्रजीत दिनांक १४/१०/२०२२ रोजी जाहिर सूचना प्रकाशित केलेली होती. त्यात ऑनलाईन जनसुनावणीसाठीचा बैठक नंबर व बैठक पासवर्ड उपलब्ध करण्यात आलेला होता. त्यात नियोजित प्रकल्पामुळे परिसरातील रहिवाशी, पर्यावरणविषयक कार्यरत संस्था, सदर प्रकल्पामुळे विस्थापित होणारे रहिवाशी किंवा सदर प्रकल्पामुळे अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवाशी यांना सदर प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक, विचार, टीकाटिप्पणी, सूचना किंवा आक्षेप जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून जनसुनावणीच्या तारखेपर्यंत स्थानिक चंद्रपूर कार्यालयात लेखी वा ईमेलव्दारे सादर करण्याचे आवाहन करण्यात आलेले होते. त्यानुसार उप प्रादेशिक कार्यालय, चंद्रपूर यांचेकडे २८ लेखी आक्षेप प्राप्त झालेले आहे.

या प्रकल्पाबाबत तयार करण्यात आलेला प्रारुप पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांश अहवाल इंग्रजी व मराठीत खालील अधिसूचित कार्यालयात नागरिकांच्या अवलोकनार्थ व माहितीसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेला होता:-

१) पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, १५वा मजला, नवीन प्रशासकीय इमारत, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंब-४०० ०३२
२) सहसंचालक (जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉईंट, 3रा माळा, पीव्हीआर सिनेमागृहासमोर, सायन सर्कलजवळ, सायन पूर्व, मुंबई-४०० ०२२
३) प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला माळा, रेल्वे स्टेशन रस्ता, चंद्रपूर.
४) उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला माळा, रेल्वे स्टेशन रस्ता, चंद्रपूर
५) जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर.
६) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर.
७) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, चंद्रपूर.
८) उप विभागीय अधिकारी, उप विभागीय कार्यालय, राजुरा, ता. राजुरा, जि. चंद्रपूर
९) मुख्य अधिकारी, नगर परिषद, राजूरा, ता. राजूरा, जि. चंद्रपूर.

१०) तहसिल कार्यालय, राजूरा, ता. राजूरा, जि. चंद्रपूर.
११) पंचायत समिती कार्यालय, राजुरा, ता. राजुरा, जि. चंद्रपूर.
१२) ग्रामपंचायत कार्यालय, मुठरा, ता. राजुरा, जि. चंद्रपूर.
१३) ग्रामपंचायत कार्यालय, हरदोना, तालुका- राजुरा, जिल्हा- चंद्रपूर
१४) ग्रामपंचायत कार्यालय, कळमना, तालुका- राजुरा, जिल्हा- चंद्रपूर
१५) ग्रामपंचायत कार्यालय, खामोना, तालुका- राजुरा, जिल्हा- चंद्रपूर
१६) ग्रामपंचायत कार्यालय, आर्वी, तालुका- राजुरा, जिल्हा- चंद्रपूर
१७) ग्रामपंचायत कार्यालय,पांढरपौनी, तालुका- राजुरा, जिल्हा- चंद्रपूर
१८) ग्रामपंचायत कार्यालय, चिंचोली, तालुका- राजुरा, जिल्हा- चंद्रपूर
१९) ग्रामपंचायत कार्यालय, मंगी, तालुका- राजुरा, जिल्हा - चंद्रपूर
२०) ग्रामपंचायत कार्यालय,गोटेगांव, तालुका- राजुरा, जिल्हा - चंद्रपूर
२१) ग्रामपंचायत कार्यालय, चांदवाही, तालुका-राजुरा, जिल्हा - चंद्रपूर
२२) ग्रामपंचायत कार्यालय, पांचगाव, तालुका- राजुरा, जिल्हा - चंद्रपूर

वरिल अनुक्रमांक ०५ ते २२ वर नमुद अधिसुचित शासनाच्या विभागांनादेखील त्यांनी त्यांच्या स्तरावर सदरहू पर्यावरणविषयक जनसुनावणीबाबत व्यापक प्रसिध्दी देण्याबाबत कळविण्यात आलेले होते. अशा प्रकारे जाहिर जनसुनावणीबाबत अधिसुचनेमध्ये नमुद केलेल्या पध्दतीचा अवलंब करुन व्यापक स्वरुपात प्रसिध्दी देण्यात आली, जेणेकरुन प्रकल्पबाधित किंवा संबंधित व्यक्तींना त्यांचे विचार, टीकाटिप्पणी, सूचना वा आक्षेप संबंधित विभागास नोंदविणे सोईचे होईल.

पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचनेनुसार सदरहू जनसुनावणी ही प्रकल्पा स्थानावर आयोजित करण्यात आलेली होती.

पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ च्या पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचनेनुसार सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी कार्यालयीन आदेश ई-८२/२०२२ व्दारा पत्र क्रं. बीओ/जेडी (डब्ल्युपीसी) पीएच/बी-२२१०१९-एफटीएस-००८८ दिनांक १९/१०/२०२२ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली:-

| | | |
|---|---|---|
| १) जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर<br>किंवा त्यांचे प्रतिनिधी<br>(अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा<br>कमी दर्जाचा नसावा) | - | **अध्यक्ष** |
| २) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई<br>यांचे प्रतिनिधी - प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर | - | **सदस्य** |

३) उप प्रादेशिक अधिकारी, - **समन्वयक**
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर

या कार्यालयास उपरोक्त प्रकल्पाबाबत २८ सूचना, तक्रारी, निवेदने, आक्षेप प्राप्त झालेले असून संबंधित व्यक्ती/संस्था यांना जनसुनावणीस उपस्थित राहून त्यांच्या सूचना सूचना, तक्रारी, निवेदने, आक्षेप उपस्थित करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

जनसुनावणी दरम्यान उपस्थितांचे हजेरीपट तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर जाहिर जनसुनावणी घेण्यासाठी गठित केलेल्या समितीचा आदेश सहपत्र-2 प्रमाणे सोबत जोडलेले आहेत.

**<u>जनसुनावणीचे इतिवृत्तः-</u>**

जनसुनावणीच्या सुरवातीस श्री अतुल सातफळे, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ. चंद्रपूर तथा समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री विशालकुमार मेश्राम, अपर जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर तथा अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री अ. मा. करे, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ. चंद्रपूर तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्पाचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरण क्षेत्रातील कार्यरत विविध संस्था व मोठया संख्येने उपस्थित स्थानिक यांचे स्वागत करुन जनसुनावणीच्या कार्यपध्दतीबद्दल माहिती दिली. त्यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणविषयक सूचना, विचार, आक्षेप उपस्थित करण्याचे आवाहन केले. त्यांनी सांगितले की सदरहू जनसुनावणी ही स्थानिक, प्रकल्पग्रस्त यांच्यासाठीच आयोजित करण्यात आलेली असून, जेणेकरून पर्यावरणविषयक प्रश्न, शंका यांचे निरसन होईल.

समन्वयक यांनी सांगितले की सदरहू समिती ही उपस्थितांचे प्रस्तावित प्रकल्पाविषयीचे पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेप नोंदविण्यासाठी असून सदरहू समितीस प्रकल्पास मंजूरी देणे, नाकारणे वा शिफारस करण्याचा अधिकार नाही. बैठकीत उपस्थितांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेपांची नोंद घेण्यात येऊन त्याचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येऊन ते अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, प्राप्त झालेल्या लेखी सूचना यांच्यासह अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, म.प्र.नि.मंडळ ह्याच्या तर्फे पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन, नवी दिल्ली यांना सादर करण्यात येईल. तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते.

त्यांनी सांगितले की अधिसूचनेतील तरतुदींनुसार सदरहू बैठकीचे छायाचित्रिकरण व व्हिडीओ शुटींग करण्यात येत असून सादरीकरणानंतर उपस्थितांना आपले प्रश्न, सूचना, विचार,

आक्षेप शांतपणे मांडावेत. त्यास प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार किंवा प्रकल्प प्रवर्तक उत्तर देतील. प्रश्न विचारताना प्रथम आपले संपूर्ण नांव व गाव सांगण्यात यावे.

समन्वयक यांनी अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांना प्रस्तावित प्रकल्पाचे पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत (Environment Management Plan) सादरीकरण करण्याची सूचना केली.

प्रकल्प अधिकारी यांनी प्रकल्पाचे विस्तारिकरण व पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत (Environment Management Plan) सादरीकरण मराठी भाषेत केले. सादरीकरणात प्रामुख्याने खालील बाबी स्पष्ट करण्यात आल्याः-

- प्रकल्पाबाबतची सविस्तर माहिती
- प्रकल्पाचे क्षेत्रफळ, अक्षांश-रेखांश,नकाशा, बुडित क्षेत्र, लाभक्षेत्र, वन क्षेत्र,प्रकल्पाचे वैशिष्ट्ये,प्रकल्पाचे महत्व, परिणाम, जमीन वापर, भूकंप स्थिरता,
- प्रकल्पाचा उद्देश, सामाजिक स्थिती, रोजगाराची संधी, शेतक-यांच्या प्रकल्पामुळे होणारा विकास,
- प्रकल्पाचे विश्लेषण,. सारांश, निष्कर्ष
- सामाजिक व आर्थिक स्थितीचे विश्लेषण
- हवा, पाणी, जमीन, ध्वनी, विस्थापन इ.बाबतची माहिती,
- नियोजित प्रकल्पामुळे हवा,पाणी,विस्थापन,जैवविविधता यावर होणारे परिणाम व व्यवस्थापन
- प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर केले जाणारे पर्यावरण व्यवस्थापन याबाबतची माहिती
- इतर पर्यावरण व्यवस्थापन विषयीची माहिती

समन्वयक यांनी उपस्थितांना त्यांचे प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही विचार, टीकाटिप्पणी, सूचना किंवा आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले. सदरहू जनसुनावणी ही पर्यावरणविषयक असल्याने पर्यावरणविषयकच प्रश्न उपस्थित करण्याची व सूचना, आक्षेप नोंदविताना प्रथम आपले संपूर्ण नांव व गाव सांगण्याची सूचना केली.

**<u>जनसुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीकाटिप्पणी, आक्षेप, सूचना तसेच प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार/ पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने खालीलप्रमाणे:-</u>**

१) **श्री मनोज कुलरकर, ग्रामपंचायत सदस्य, पाचगांव, तालुका-राजुरा, जिल्हा-चंद्रपूर:-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | आमची एकच मागणी आहे की स्थानिकांना प्रकल्पात रोजगार हा मिळालाच पाहिजे. पाचगांवात पुष्कळ सुशिक्षित बेरोजगार आहेत. तरी माझी व इतर ग्रामपंचायत सदस्यांतर्फे विनंती करण्यात येते की २०-३० स्थानिकांना प्रकल्पात रोजगाराची संधी देण्यात यावी. | सूचनेची नोंद घेण्यात आली.<br>प्रकल्प प्रवर्तक यांनी माहिती दिली की प्रकल्प बांधकाम टप्प्यात व प्रकल्प पूर्ण झाल्यांनंतर कार्यान्वित करण्यासाठी पुढील दीड-दोन वर्षांसाठी लागणाऱ्या कुशल, अर्धकुशल आणि अकुशल संवर्गात रोजगार स्थानिकांना देण्यासाठी आजूबाजूच्या गावातील सरपंचांना पत्रे पाठविण्यात आलेली आहेत. त्याशिवाय एखाद्या स्थानिकांना उपरोक्त संवर्गात जर रोजगार हवा असल्यास सरपंचाचे पत्र आणल्यास त्यांची मुलाकात घेण्यात येईल |

२) **श्री नंदकिशोर सुभाष वाडे, सरपंच,ग्रामपंचायत कळमना, तालुका- राजुरा, जिल्हा - चंद्रपूर तथा महासचिव, अखिल भारतीय सरपंच संघटना, महाराष्ट्र राज्य -**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | परिसरातील कार्यरत डिशल्ड कोल क्रशिंग प्रकल्पाचे वेट कोल वॉशरीमध्ये परिवर्तन होत आहे. परिसरासाठी ते चांगले आहे. तरी या प्रकल्पाचे परिवर्तन होत असताना प्रकल्पामुळे जी गावे बाधित होत आहेत, त्या प्रकल्पग्रस्त लोकांना व गावांना नागरी सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्यात याव्यात. त्यासाठी प्रथम त्या बाधित गावातील तरुण तरुणींना प्रकल्पात रोजगाराची संधी देण्यात यावी. | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की प्रकल्पग्रस्त व स्थानिकांना प्रकल्पात रोजगाराची संधी देण्यात येईल. त्यासाठी प्रकल्प बांधकाम टप्प्यात व प्रकल्प पूर्ण झाल्यांनंतर कार्यान्वित करण्यासाठी पुढील दीड-दोन वर्षांसाठी लागणाऱ्या कुशल, अर्धकुशल आणि अकुशल संवर्गात रोजगार स्थानिकांना देण्यासाठी आजूबाजूच्या गावातील सरपंचांना पत्रे पाठविण्यात आलेली आहेत. त्याशिवाय एखाद्या स्थानिकांना उपरोक्त संवर्गात जर रोजगार हवा असल्यास सरपंचाचे पत्र आणल्यास त्यांची मुलाखात घेण्यात येईल.<br>सीएसआर निधी प्रकल्पग्रस्त गावातील नागरी सुविधा पुरवण्यासाठी उपलब्ध करण्यात येईल, |

| | | |
|---|---|---|
| २) | सादरीकरणात विविध पर्यावरण व्यवस्थापन योजनांवर किती खर्च करणार आहेत, ते दर्शविलेले आहे. त्याचप्रमाणे बाधित गावांना सीएसआर निधी उपलब्ध करण्यात आला पाहिजे. गावाचा विकास हा सीएसआर निधीतून झाला पाहिजे. | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की सीएसआर निधी प्रकल्पग्रस्त गावातील नागरी सुविधा पुरवण्यासाठी उपलब्ध करण्यात येईल. |
| ३) | हा प्रकल्प कोळसा धुण्यासाठी आहे. तर जो कोळसा वीजनिर्मितीसाठी लागणार आहे, तर या बाधित गावात सोलर ग्रीडच्या माध्यमातून वीजनिर्मिती प्रकल्प हाती घेतला, तर या बाधित गावातील अंधार दूर होऊन प्रकाश येईल व महावितरण कंपनीवरिल भार निश्चितच कमी होईल. | प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की सौर ऊर्जा सयंत्रे हे निश्चितच पुरविण्यात येईल. त्यावेळी श्री नंदकिशोर वाडे यांनी सांगितले की सौर उर्जेचे पॅनल लावून वीज गावाला द्यायची आहे. त्यावेळी प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की गावाची जी गरज आहे, त्याचे पत्र आल्यास त्याबाबत निश्चितच विचार करण्यात येईल. |
| ४) | गावाचा प्रथम नागरिक व अखिल भारतीय सरपंच संघटनेचा प्रतिनिधी म्हणून मत मांडतो की बैठकीस जिल्हाधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. तर त्यांना विनंती करण्यात येते की सदरहू कार्यरत प्रकल्पाचे रुपांतर होत आहे. तर सादरीकरणात दर्शविल्याप्रमाणे पर्यावरण योजना ह्या नुसत्या कागदावर न राहता त्या कृतीत आणल्या पाहिजेत. त्यासाठी जिल्हाधिकारी स्तरावर निर्णय घेण्यात यावेत. येथील अनुभवी व जेष्ठ नागरिक, ग्रामपंचायत प्रतिनिधी, पोलिस पाटील यांचा समन्वय साधण्यात येऊन त्यांच्या अनुभवाचा फायदा घेण्यात येऊन कंपनीने पर्यावरण योजनांवर योग्य प्रकारे काम केले पाहिजे. आमचे गाव येथून दोन कि.मी. अंतरावर असून आम्ही दोन हजार झाडे लावलेली आहेत. ऑक्सिजन पार्कसुध्दा लावलेले आहेत. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| ५) | गावात सेवाभावी युवक,युवती, लोकप्रतिनिधी, स्थानिक हे जर गावात विधायक कार्य करत असतील, तर कंपनीने त्याच्यासोबत राहिले पाहिजे. कंपनीची प्रगती व्हावी अशी प्रार्थना करताना कंपनीच्या माध्यामातून गावाचा विकास व्हावा ही आशा व्यक्त करतो. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

३) श्री हरिदास झाडे, सरपंच, खामोना ग्रामपंचायत, तालुका- राजुरा, जिल्हा - चंद्रपूर:-

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | गेले ७-८ वर्षे सदरहू कंपनी कार्यरत आहे. मात्र परिसरात गेले ७-८ वर्षात पर्यावरणाचे काहीही काम केल्याचे दिसत नाही. त्याचप्रमाणे प्रकल्पातही पर्यावरण संरक्षणाची योजना कंपनीने राबवविलेली दिसून येत नाही. कंपनीला लागूनच आदिलाबाद हाय वे आहे. या हायवेवरुन ये-जा करणाऱ्यांना या कंपनीतील प्रदूषणाचा प्रचंड त्रास होत आहे. त्या प्रदूषणावर कंपनीचे नियंत्रण नाही. कंपनी प्रशासन टँकरने पाणी शिंपडत नाही. | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की कंपनीकडून पर्यावरण व्यवस्थापन योजना राबविण्यात येते. त्याचप्रमाणे टँकरने पाणी मारण्यात येते.<br>समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की रेल्वे साईडिंगला डस्ट प्रदूषणाविषयी ज्या तक्रारी येत आहेत, तर त्यासाठी Mist Type Fogger का लावत नाही अशी विचारणा केली समन्वयक यांनी सांगितले की Mist Type Fogger हा movable, truck mounted, tractor mounted उपलब्ध असतो. समन्वयक यांनी Mist Type Fogger रत्यावरही transportation issue असल्याने व रेल्वे साईडिंगला लावण्याची सूचना केली. प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की त्याबाबत त्वरित पुढील कार्यवाही करण्यात येईल. |
| २) | या परिसरातील शेतकरी हा आपल्या शेतीवर जगत असतो. कंपनी उत्पादनासाठी प्रचंड प्रमाणात पाणी वापरते, त्यामुळे परिसरातील पाण्याची पातळी ही खूपच खोल गेलेला असून शेतकऱ्यांना शेतीसाठी पाणी मिळत नाही. वीजेचाही तुटवडा शेतकऱ्यांना या कंपनीमुळे मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागतो. | कंपनी ही गावातील पाण्याचा स्त्रोत वापरत नाही. तर पाणी हे सास्ती कोलयरीपासून पाण्याच्या टँकरव्दारे घेण्यात येईल. |
| ३) | कंपनीतील प्रदूषणामुळे शेतकऱ्यांच्या पीकांचे जे नुकसान होते, त्याचा मोबदलाही कंपनीकडून मिळत नाही. कंपनी कुठल्याही प्रकारे प्रदूषण नियंत्रण करत नाही. सादरीकरणात जे सांगितले, तसे ही कंपनी काहीही करत नाही असा अनुभव आहे. एखादा स्थानिक जर काम मागण्यास गेल्यास त्याला हाकलून लावण्यात येते. स्थानिकांना रोजगार देण्याची टाळाटाळ करण्यात येते. | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की नुकसानभरपाई ही वेळोवेळी आदा करण्यात आलेली आहे. |

| | | |
|---|---|---|
| ४) | येथील लोक कंपनीचे स्वागत करतात, मात्र स्थानिक शेतकऱ्यांना नुकसानाची भरपाई वेळोवेळी मिळाली पाहिजे. स्थानिकांना प्रकल्पात रोजगार दिला पाहिजे. प्रदूषणाचे संतुलन राखूनच ही कंपनी चालू झाली पाहिजे. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

४) **<u>श्री जितेंद्र बाबूराव जिवणे, पोलिस पाटील, मुठरा, तालुका- राजुरा, जिल्हा - चंद्रपूरः-</u>**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | कंपनीच्या पर्यावरण सल्लागार यांनी प्रस्तावित प्रकल्पाचे सादरीकरण केलेले आहे. ५-६ वर्षांपूर्वी या कंपनीचे याच ठिकाणी सादरीकरण झालेले होते व त्यावेळीही कंपनीने प्रदूषण नियंत्रण, सांडपाणी नियंत्रण, स्थानिकांना रोजगार याबाबत आश्वासन दिलेले होते. गेल्या ७-८ वर्षांपासून परिसरातील बाधित गावांचा अनुभव आहे की कंपनी स्थानिकांबाबत कुठलेही आश्वासन पाळत नाही. | प्रकल्पात स्थानिक कामगार कार्यरत असून भविष्यातही स्थानिकांनाच प्राधान्य देण्यात येईल. त्याचप्रमाणे प्रकल्प बांधकाम टप्प्यात व प्रकल्प पूर्ण झाल्यांनंतर कार्यान्वित करण्यासाठी पुढील दीड-दोन वर्षांसाठी लागणा-या कुशल, अर्धकुशल आणि अकुशल संवर्गात रोजगार स्थानिकांना देण्यासाठी आजूबाजूच्या गावातील सरपंचांना पत्रे पाठविण्यात आलेली आहेत. त्याशिवाय एखाद्या स्थानिकांना उपरोक्त संवर्गात जर रोजगार हवा असल्यास सरपंचाचे पत्र आणल्यास त्यांची मुलाखात घेण्यात येईल. |
| २) | कंपनी प्रशासनाने येथे सांगावे की बाधित गावात किती वैदकीय शिबिरे आयोजित करण्यात आली, सीएसआर निधी किती खर्च करण्यात आला. आताही तसेच होईल. मुठरा ग्रामपंचायतीने याबाबत स्थानिक महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास तक्रार करण्यात आलेली आहे. सदरहू पर्यावरण अनुमती (Environment Clearance) ची मुदत ही जानेवारी, २०२२ लाच संपलेली असून एवढ्या उशिरा कशी जनसुनावणी घेण्यात येते?<br>प्रकल्प विस्तारिकरणासाठी कंपनीने गावातील जमिनी घेतलेल्या असून त्यावर अवैध बांधकाम करण्यात आलेले असून ग्रामपंचायतीने त्याबाबत विचारणा केली असता कंपनीने पुढील कार्यवाही केलेली नाही. | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की मागच्या वर्षी सरपंच, खांमोना गाव यांनी मागणी केल्याप्रमाणे तेथे आरोग्यशिबिर आयोजित करण्यात आलेले होते. प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की दर तीन महिन्याने वैदकीय शिबिर आयोजित करण्याचे प्रयोजन आहे. |

| | | |
|---|---|---|
| ३) | कंपनीतून कोळशाची वाहतुक करताना कंपनीत अगोदर कोल क्रशिंग केल्यानंतर व कोळसा धुतल्यानंतर मागील बाजूस रेल्वे सायडिंगला टाकला जातो. तेथून तो रेल्वेत लोड केला जातो. कंपनी कोळसा जेथे टाकताना तेथे प्रचंड प्रमाणात धुळ उडते. त्यामुळे शेजारील शेतातील कापूस हा पूर्णपणे काळा होतो. त्याठिकाणी काम करण्यास मजूर नकार देतात. तरी कोळसा टाकण्याचा जागेचा/रेल्वे सायडिंग व आजूबाजूच्या शेतांचे सर्वेक्षण आजही करु शकता, ते करावे त्यामुळे तेथील वस्तूस्थिती लक्षात येईल. | सूचनेची नोंद घेण्यात आली.<br>प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की कंपनीकडून पर्यावरण व्यवस्थापन योजना राबविण्यात येते. त्याचप्रमाणे टँकरने पाणी मारण्यात येते.<br>समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की रेल्वे साईडिंगला डस्ट प्रदूषणाविषयी ज्या तक्रारी येत आहेत, तर त्यासाठी Mist Type Fogger का लावत नाही अशी विचारणा केली. समन्वयक यांनी सांगितले की Mist Type Fogger हा movable, truck mounted, tractor mounted उपलब्ध असतो. समन्वयक यांनी Mist Type Fogg रत्यावरही transportation issue असल्याने व रेल्वे साईडिंगला लावण्याची सूचना केली. प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की त्याबाबत त्वरित पुढील कार्यवाही करण्यात येईल. |
| ४) | त्याचप्रमाणे लोडिंग करत असताना ती रेल्वेगाडी मुठरा गावाला जाणा-या रस्त्यावर उभी असते. मुथरा गावाला जाण्यासाठी कुठलाही पर्यायी मार्ग नाही. यावेळी एखादी आजारी व्यक्ती, त्वरित औषधोपचार लागणारा व्यक्ती, वयस्कर व्यक्तींसाठी दुसरा पर्यायी रस्ता नाही. प्रकल्प व्यवस्थापनास याबाबत तक्रार केल्यास ते रेल्वेगाडी फकत १०-१५ मिनिटेच उभी राहते असे सांगतात. येथील गावक-यांनी पाहिलेले आहे की चालू ट्रेनमध्येही यांचे लोडिंग चालू राहते. | सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी हा प्रश्न त्वरित सोडविण्याची सूचना केली. त्यावेळी प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की रेल्वे जर दोन-दोन तास उभी राहिली तर आमचेसुध्दा नुकसान आहे. आम्ही दक्षिण-मध्य रेल्वेला सिकंदराबादलासुध्दा पत्रव्यवहार केला. त्यालासुध्दा रेल्वेकडून प्रतिसाद नाही.<br>यावेळी समन्वयक यांनी मत मांडले की ज्यावेळी शाळेच्या, कार्यालयीन वेळा जेव्हा असतील, त्यावेळी तेथे रेल्वे उभी राहू नये. प्रकल्प प्रवर्तक यांनी पुढे सांगितले की दक्षिण-मध्य रेल्वे सिकंदराबाद येथून रॅक उपलब्ध झाल्यानंतर ते पुरवितात. वेळ सांगत नाहीत.<br>सदस्य यांनी येथे मत मांडले की गावक-यांचा हा प्रश्न सोडविलाच पाहिजे. त्यांचे निवेदन घेऊन त्यांच्यासोबत रेल्वेच्या वरिष्ठ अधिका-यांना भेटण्यात यावे. त्यावेळी काही उपस्थितांना सूचना केली की कंपनीच्या लगत |

| | | |
|---|---|---|
| | | पक्का रस्ता करण्याचे आश्वासन कंपनीने दिलेले होते, ते पुर्ण करण्यात यावे. काही स्थानिकांनी गावकऱ्यांनी ना हरकत प्रमाणपत्र दिल्यास रेल्वे लाईनच्या खालून किंवा वरुन रस्ता देण्यांस तयार होते, मात्र काही गावकऱ्यांनी दोन्ही रस्ते (वरुन व खालून) बांधण्याची मागणी केल्याने ग्रामपंचायतीने ना हरकत प्रमाणपत्र दिलेले नाही. |
| ५) | आमचा उद्योगास विरोध नाही. मात्र स्थानिकांच्या अडचणी दूर करण्याचे सहकार्य कंपनी करत नाहीत. तरी शासनास विनंती आहे की सदरहू प्रकल्प प्रशासनाकडून विविध सामाजिक उपक्रम राबविण्यासाठी व स्थानिकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी लेखी स्वरुपात अभिवचन घेण्यात यावे. मागच्या जनसुनावणीच्या वेळी भोवतालची झाडे लावलेली होती. मग आता ती झाडे कोठे गेली? | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| ६) | येथील ७५% शेतकऱ्यांचे शेती ही प्रकल्पाच्या मागून जाणा-या पाण्याच्या नाल्यावर अवलंबून आहे. मात्र सदरहू कंपनी पावसाळ्यात सदरहू पाण्याचा उपयोग करते. मग शेतकऱ्यांनी काय करावे? त्याचप्रमाणे कंपनीचे स्वतःचे पाण्याची नियोजन काय आहे? यासाठी शासनाने प्रकल्पाकडून कोणताच त्रास होणार नाही अशी लेखी हमी प्रकल्प प्रशासनाकडून घेण्यात यावी. | सूचनेची नोंद घेण्यात आली. प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की सास्ती कोलीयरीपासून पाणी टँकरव्दारे घेण्यात येईल. |

**५) <u>श्री पांडुरंग रघुनाथ चन्ने, राहणार-पांढरपौनी, तालुका-राजुरा, जिल्हा-चंद्रपूरः-</u>**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | या प्रकल्पाला लागूनच माझे शेत आहे. त्यात पेरू, इतर फळफळावळ लावलेली आहे. कोल वॉशरीच्या पूर्वी वर्षाचे ५-६ लाखाचे कमीतकमी उत्पन्न होत असे. चौपदरी रस्त्याच्या वेळी प्रशासनाने चाळीस लाख एकोणतीस हजार | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | नुकसान भरपाई दिली. या कंपनीकडून फक्त दीड लाख नुकसानभरपाई दिली जाते, आता मुलगा बघतो, त्यामुळे किती मिळते माहित नाही. तरी क्रशर कुठल्या भागात सुरु होणार ते कळवावे, कारण रस्ता अगदी लागूनच आहे. त्यामुळे रात्रीच्यावेळी अपघात होण्याची जास्त शक्यता आहे. पाण्याचा वापर कंपनीत कमी प्रमाणात होतो, रस्ता स्वच्छ नसतो. तरी क्रशर हा रेल्वे यार्डाच्या बाजूस असावा. | |
| २) | त्याचप्रमाणे सादरीकरण व प्रकल्पाची सर्व माहिती पुस्तिकेच्या रुपात जनतेस उपलब्ध करुन देण्यात येणे आवश्यक होते. | समन्वयक यांनी सांगितले की पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांश अहवाल यांच्या इंग्रजी व मराठी प्रति सर्व प्रकल्पबाधित ग्रामपंचायत कार्यालयात आगाऊ उपलब्ध करण्यात आल्या असून त्याची पोच म.प्र.नि.मंडळ कार्यालयात आहे. |
| ३) | आमचे गाव प्रकल्पापासून एक कि.मी. अंतरावर आहे. मात्र आमच्या गावात वैदकीय शिबिर किंवा आरोग्य तपासणी करण्यात आलेली नाही. गावातील शाळेला मदत केलेली नाही. | सूचनेची नोंद घेण्यात आली.<br>प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की मागच्या वर्षी सरपंच, खामोना गाव यांनी मागणी केल्याप्रमाणे तेथे आरोग्यशिबिर आयोजित करण्यात आलेले होते. प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की दर तीन महिन्याने वैदकीय शिबिर आयोजित करण्याचे प्रयोजन आहे. |
| ४) | जर जमिनीसाठी चाळीस लाख मोबदला देण्यात आला, तर ही कंपनी फळबाग नुकसानीसाठी किती मोबदला देऊ शकते? | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की नुकसानभरपाई वेळोवेळी अदा करण्यात आलेली आहे. |
| ५) | रेल्वेच्या पलिकडील बाजूस क्रशर लावण्यास परवानगी देण्यात यावी. अलिकडे दिली तर रस्त्यावर मोठ्या प्रमाणात धुळीचे प्रदूषण होईल. दुचाकी अपघाताचे प्रमाण गंभीरपणे वाढतील. रस्त्यात स्पीड ब्रेकर जरी लावले, तरी त्यावर पांढरे पट्टे नाहीत, त्यामुळे बरीच दुचाकी वाहने घसरुन अपघात होतात. तरी क्रशरला रेल्वेच्या पलिकडून परवानगी देण्यात यावी. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

६) <u>श्री सुधीर आनंदराव लांडे, उपसरपंच, पांढरपौनी, तालुका-राजुरा, जिल्हा-चंद्रपूरः-</u>

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | ज्याप्रमाणे सदरहू कंपनीत आजूबाजूच्या युवकांना रोजगार मिळत होता, तरी येथील स्थानिक युवक युवतींना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार प्रकल्पात रोजगार मिळाले पाहिजे. आजूबाजूच्या शेतकऱ्यांना कंपनी जी नुकसान भरपाई देते, ती नुकसानीच्या प्रमाणात देण्यात यावी. कंपनीने जसे वृक्षारोपण केले, त्याप्रमाणे प्रकल्पाच्या भोवतालच्या गावात सामाजिक विकास कामात कंपनीने सहभाग घेण्याची कंपनीस सूचना देऊन प्रकल्पास मान्यता देण्यात यावी. | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की प्रकल्पग्रस्त व स्थानिकांना प्रकल्पात रोजगाराची संधी देण्यात येईल. त्यासाठी प्रकल्प बांधकाम टप्प्यात व प्रकल्प पूर्ण झाल्यांनंतर कार्यान्वित करण्यासाठी पुढील दीड-दोन वर्षांसाठी लागणाऱ्या कुशल, अर्धकुशल आणि अकुशल संवर्गात रोजगार स्थानिकांना देण्यासाठी आजूबाजूच्या गावातील सरपंचांना पत्रे पाठविण्यात आलेली आहेत. त्याशिवाय एखाद्या स्थानिकांना उपरोक्त संवर्गात जर रोजगार हवा असल्यास सरपंचाचे पत्र आणल्यास त्यांची मुलाखात घेण्यात येईल.<br>सीएसआर निधी प्रकल्पग्रस्त गावातील सामाजिक योजना, नागरी सुविधा पुरवण्यासाठी उपलब्ध करण्यात येईल. |

७) <u>श्री धनाजी बापूजी बोबडे, राहणार-मुठरा, तालुका-राजुरा, जिल्हा-चंद्रपूरः-</u>

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | माझे गाव गोईंजपूर या राष्ट्रीय महामार्गावर असल्यामुळे महामार्गावरिल धुळीचे कण आमच्या आजूबाजूच्या गावात पसरतात. त्यामुळे तेथील लोकांना त्रास होतो. कधीकधी पाणी मारुन चिखल करुन ठेवतात, त्यामुळे रात्री-बेरात्री दुचाकीवरुन जाताना अपघात होतात. पांढरकवडा गावाजवळ रेल्वे यार्ड असल्याने सर्वात जास्त त्रास हा मुठरा गावाला होतो. अशीच जनसुनावणी ही ४-५ वर्षांपूर्वी झालेली होती, त्यावेळी दिलेली कुठलीही आश्वासने कंपनीने पाळलेली नाहीत. गावातील विकास कामांसाठी कुठलीही मदत केलेली नाही. कंपनीच्या अधिकाऱ्यांशी संपर्क केल्यास ते | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | उडवाउडवीची उत्तरे देतात. नंतर फोनसुध्दा घेत नाहित. | |
| २) | येथे रेल्वे कोल घेण्यासाठी रेल्वेगाडी ही ३-४ तास थांबवतात. दवाखान्यातसुध्दा जाता येत नाही. त्यामुळे जर एखाद्या रुग्णाचा मृत्यू झाल्यास त्याची जबाबदारी कोण घेणार आहे? कंपनीने गावासाठी काहीही खर्च केलेला नाही. | सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी हा प्रश्न त्वरित सोडविण्याची सूचना केली. त्यावेळी प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की रेल्वे जर दोन-दोन तास उभी राहिली तर आमचेसुध्दा नुकसान आहे. आम्ही दक्षिण-मध्य रेल्वेला सिकंदराबादलासुध्दा पत्रव्यवहार केला. त्यालासुध्दा रेल्वेकडून प्रतिसाद नाही.<br>यावेळी समन्वयक यांनी मत मांडले की ज्यावेळी शाळेच्या,कार्यालयीन वेळा जेव्हा असतील, त्यावेळी तेथे रेल्वे उभी राहू नये. प्रकल्प प्रवर्तक यांनी पुढे सांगितले की दक्षिण-मध्य रेल्वे सिकंदराबाद येथून रॅक उपलब्ध झाल्यानंतर ते पुरवितात. वेळ सांगत नाहीत.<br>सदस्य यांनी येथे मत मांडले की गावक-यांचा हा प्रश्न सोडविलाच पाहिजे. त्यांचे निवेदन घेऊन त्यांच्यासोबत रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना भेटण्यात यावे. त्यावेळी काही उपस्थितांना सूचना केली की कंपनीच्या लगत पक्का रस्ता करण्याचे आश्वासन कंपनीने दिलेले होते, ते पुर्ण करण्यात यावे. काही स्थानिकांनी गावक-यांनी ना हरकत प्रमाणपत्र दिल्यास रेल्वे लाईनच्या खालून किंवा वरून रस्ता देण्यास तयार होते, मात्र काही गावकऱ्यांनी दोन्ही रस्ते (वरुन व खालून) बांधण्याची मागणी केल्याने ग्रामपंचायतीने ना हरकत प्रमाणपत्र दिलेले नाही. |
| ३) | कंपनीच्या प्रदूषणाच्या त्रासामुळे मी स्वतः जिल्हाधिकारी यांना, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास व इतर विभागांशी पत्रव्यवहार केलेला आहे. त्यावर पुढे काहीही कार्यवाही झालेली नाही. जर कंपनीच्या बाजूने पाईप टाकून जर मार्ग निघत असेल, तर शेतकऱ्यांसाठी तो मार्ग तयार करुन द्यावा. पण तो करत नाही. शेतकऱ्यांना बैलपंडातही | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | जाता येत नाही. जिल्हाधिकारी यांची भेट मागितल्यास ते वेळ नाही सांगतात. | |
| ४) | तरी कंपनीने स्थानिकांचे प्रश्न सोडवावेत. येथील नाला हा नंदीपासून सास्तीपर्यंत जाणारा नाला आहे. आमच्या मुठरा व पांढरकवडा गावाचेच नुकसान होत आहे. बाकी गावात नाला जात नाही. त्याचप्रमाणे आमच्या रस्त्यावर एक जुने हनुमान मंदिर आहे. ते पिंपळगावाजवळ आहे. त्यास कंपनीने सहकार्य करावे. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

येथे अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मत मांडले की आतापर्यंत उपस्थितांनी उपस्थित केलेल्या सूचना, आक्षेपांनुसार असे दिसते की उपस्थितांना असे वाटते सदरहू जनसुनावणी समिती किंवा जिल्हाधिकारी कार्यालय ह्या प्रकल्पास मान्यता देणार किंवा प्रकल्प मान्यता देणार नाही. तर येथे स्पष्टीकरण देण्यात येते की सदरहू समितीस फक्त जनसुनावणी आयोजित करण्याचा अधिकार आहे. प्रकल्प मान्य करणे किंवा प्रकल्पास मान्यता नाकारणे ह्याचा अधिकार नाही. स्थानिकांनी बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेऊन त्याचे इतिवृत्त शासनास सादर करणे ही समितीची कार्यकक्षा आहे. त्याचप्रमाणे बैठकीची व्हिडिओ रेकॉर्डिंगसुध्दा शासनास सादर करण्यात येते. शासनाची तज्ज्ञ समिती त्याबाबत योग्य तो निर्णय घेत असते.

**८) <u>श्री सुदर्शन, पर्यावरणवादी:-</u>**

| **अनु. क्रं.** | **आक्षेप/सूचना/प्रश्न** | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | त्यांनी सर्वांचे जनसुनावणीत स्वागत केले. बेरोजगारी हे सर्वात मोठे प्रदूषण आहे. तरी प्रकल्पात स्थानिकांना रोजगार द्या. सीएसआर स्थानिक शिक्षणासाठी गावात खर्च करा. झाडे मोठ्या प्रमाणात लावण्यात यावीत. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

९) **श्री देविदास पडोळे, राहणार-राजुरा, तालुका-राजुरा, जिल्हा-चंद्रपूर:-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | माझे शेत बाजूलाच आहे. गेले ५-६ वर्षे कंपनीला आमचे शेतातील नुकसानीसाठी भरपाई मागितली होती. आम्हांला मिळत आहे. पण कंपनीमुळे आजूबाजूच्या ज्या शेतकऱ्यांचे नुकसान होते, त्यांनी भरपाई देण्यात यावी. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| २) | त्याचप्रमाणे कंपनीने प्रकल्पातील धुळीचे प्रदूषण हे कमी करण्यात यावे. त्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळानेही आपली जबाबदारी योग्यप्रकारे पार पाडावी. प्रकल्प प्रवर्तकांकडून जेवढी सुधारणा करता येईल, तेवढी आम्ही करण्याचा प्रयत्न करु. जनतेने सहकार्य करावे. | समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की रेल्वे साईडिंगला डस्ट प्रदूषणाविषयी ज्या तक्रारी येत आहेत, तर त्यासाठी Mist Type Fogger का लावत नाही अशी विचारणा केली. समन्वयक यांनी सांगितले की Mist Type Fogger हा movable, truck mounted, tractor mounted उपलब्ध असतो. समन्वयक यांनी Mist Type Fogger रत्यावरही transportation issue असल्याने व रेल्वे साईडिंगला लावण्याची सूचना केली. प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की त्याबाबत त्वरित पुढील कार्यवाही करण्यात येईल. |

१०) **श्री मुरलीधर रामाजी आत्राम, सदस्य, ग्रामपंचायत मुठरा,तालुका- राजुरा, जिल्हा - चंद्रपूर:-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | सादरीकरणात प्रकल्पाची माहिती देण्यात आली. सदरहू कंपनी आमच्या परिसरात असून गावाला लागूनच आहे. गावातील बेरोजगारांना काम मिळाले पाहिजे. रेल्वे साईडिंगचा त्रास आहे. शाळेच्या बसेसना रेल्वे उभी असली तर बऱ्याच वेळ थांबावे लागते. तरी कंपनीने आम्हांला पक्का रस्ता बांधून द्यावा. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| २) | ग्रामस्थांनी मागणी केली की कंपनीने गावात स्मशान शेड बांधून द्यावे. कंपनीने होकार दिलेला होता. एक वर्ष झाले. अजूनही स्मशान शेड बांधलेले नाही. तरी त्यांना विनंती आहे की स्मशान शेड बांधून द्यावे. रेल्वे थांबली की कितीही वेळ घेते. त्याचा स्थानिकांना त्रास होतो. | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की स्मशान घाटावर शेड त्वरित बांधून देण्यात येईल. |
| ३) | माझे शेत हे रेल्वे साईडींगला लागून आहे. माझे खूप नुकसान होते, शेतात खूपच धुळ येते. त्याबाबत मी निवेदने दिलेली आहेत. मात्र अद्यापपावेतो मला कोणतीही भरपाई मिळालेली नाही. निवदेनांबरोबरच नुकसानीचे फोटोसुध्दा दिलेले आहेत. कृषि अधिकारी यांचा अहवालही जोडलेला आहे. मात्र अद्यापपावेतो नुकसान भरपाई मिळालेली नाही. क्रशिंग केलेला कोल रेल्वेत लोड करताना एवढा धुळीचा त्रास होतो की त्यामुळे मजूरही शेतात काम करण्यास येत नाही. त्यामुळे माल वेळेवर निघत नाही. त्यामुळे बरेच नुकसान होते. शेतातील कापूस हा पूर्णपणे काळा होतो. | समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की रेल्वे साईडिंगला डस्ट प्रदूषणाविषयी ज्या तक्रारी येत आहेत, तर त्यासाठी Mist Type Fogger का लावत नाही अशी विचारणा केली. समन्वयक यांनी सांगितले की Mist Type Fogger हा movable, truck mounted, tractor mounted उपलब्ध असतो. समन्वयक यांनी Mist Type Fogger रत्यावरही transportation issue असल्याने व रेल्वे साईडिंगला लावण्याची सूचना केली. प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की त्याबाबत त्वरित पुढील कार्यवाही करण्यात येईल. |
| ४) | सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री आत्राम यांनी लेखी अर्ज सादर करण्याची सूचना केली. लेखी अर्ज उपलब्ध नसल्याने कार्यालयात दुसऱ्या दिवशी आणून देण्याची सूचना केली. | सूचना करण्यात आली. |

११) **<u>सौ. करिश्मा बोबडे, सरपंच, ग्रामपंचायत मुठरा, तालुका-राजुरा, जिल्हा-चंद्रपूर:-</u>**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | रेल्वे बराच वेळ उभी राहिल्याने आम्हांला बराच त्रास होतो, आजारी माणूस राहो, शाळेची मुले राहो, कमीतकमी एक-दीड तास थांबावे लागते. तरी कंपनीने पर्यायी मार्ग काढून द्यावा. | सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी हा प्रश्न त्वरित सोडविण्याची सूचना केली. त्यावेळी प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की रेल्वे जर दोन-दोन तास उभी राहिली तर आमचेसुध्दा नुकसान आहे. आम्ही दक्षिण-मध्य रेल्वेला सिकंदराबादलासुध्दा |

| | | |
|---|---|---|
| | | पत्रव्यवहार केला. त्यालासुध्दा रेल्वेकडून प्रतिसाद नाही.<br>यावेळी समन्वयक यांनी मत मांडले की ज्यावेळी शाळेच्या,कार्यालयीन वेळा जेव्हा असतील, त्यावेळी तेथे रेल्वे उभी राहू नये. प्रकल्प प्रवर्तक यांनी पुढे सांगितले की दक्षिण-मध्य रेल्वे सिकंदराबाद येथून रॅक उपलब्ध झाल्यानंतर ते पुरवितात. वेळ सांगत नाहीत.<br>सदस्य यांनी येथे मत मांडले की गावकऱ्यांचा हा प्रश्न सोडविलाच पाहिजे. त्यांचे निवेदन घेऊन त्यांच्यासोबत रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना भेटण्यात यावे. त्यावेळी काही उपस्थितांना सूचना केली की कंपनीच्या ल· पक्का रस्ता करण्याचे आश्वासन कंपनीने दिलेले होते, ते पुर्ण करण्यात यावे. काही स्थानिकांनी गावक-यांनी ना हरकत प्रमाणपत्र दिल्यास रेल्वे लाईनच्या खालून किंवा वरुन रस्ता देण्यास तयार होते, मात्र काही गावकऱ्यांनी दोन्ही रस्ते (वरुन व खालून) बांधण्याची मागणी केल्याने ग्रामपंचायतीने ना हरकत प्रमाणपत्र दिलेले नाही. |
| २) | गावतील बेरोजगारांना प्रकल्पात रोजगारासाठी प्रथम प्राधान्य देण्यात यावे. | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की याचे उत्तर देण्यात आलेले आहे. |
| ३) | प्रकल्पातील सांडपाणी हे नाल्यात येते. त्याबाबत तोडगा त्वरित काढण्यात यावा. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

**१२) श्री मारुती नारायण आगलावे, राहणार-मुठरा, तालुका-राजुरा, जिल्हा-चंद्रपूर:-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | माझे शेत जवळच आहे. प्रकल्पातील धुळीमुळे शेतीचे बरेच नुकसान झालेले आहे. शेतात लावलेला भाजीपाला हा काळा होतो. भाजीपाला कितीही धुतला तर तो हिरवा होत नाही. तरी धुळ व | सूचनेची नोंद घेण्यात आली. प्रकल्प प्रवर्तक यांनी फॉगर लावण्याचे मान्य केलेले आहे. |

| | | |
|---|---|---|
| | प्रदूषण रोखण्यासाठी त्वरित उपाययोजना राबविण्यात याव्यात. | |

१३) **श्री शंकर आत्राम, राहणार-पांढरपौनी, तालुका-राजुरा, जिल्हा--चंद्रपूर:-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मीच येथील कंत्राटदार होतो. प्रकल्प प्रवर्तकांनी झाडे लावलेली आहेत. तसेच प्रकल्प प्रवर्तकांनी राजुरा येथील रॅगिट येथून पाणी आणलेले आहे, मागील नाल्याचे पाणी घेतलेले नाही. | उपस्थित सूचनेची नोंद घेण्यात आली. |

१४) **श्री रंजन आनंदराव लांडे, राहणार-पांढरपौनी, तालुका-राजुरा, जिल्हा-चंद्रपूर:-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | येथे प्रत्येकजण आपल्या समस्या मांडत आहे. तरी बेरोजगारी हाही विषय महत्त्वाचा आहे. त्यासाठी प्रकल्प होणे गरजेचे आहे. आजूबाजूच्या शेतकऱ्यांना कंपनी नुकसान भरपाई देत आहे. तरी शेतकऱ्यांनी अर्ज करुन नुकसान भरपाईची मागणी करावी. पण रोजगारी हासुध्दा एक विषय आहे.प्रकल्पात स्थानिक लोकांनाच रोजगार दिला जातो. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| २) | पांढरपौनी गावात दोन वर्षे दुष्काळ असताना कंपनीने राजुरा येथून चांगल्या पाण्याचे टँकर्स विकत घेऊन गावाच्या नळयोजनेच्या विहिरीत पाणी टाकत होते व नंतर गावकऱ्यांना पाणी पुरवत होतो. त्यावेळी गावासाठी मदत केली. ही दहा गावेच नाही, तर कंपनीने परिसरात सामाजिक कार्य केले पाहिजे. | सूचनेची नोंद घेण्यात आली. कंपनीने वेळोवेळी सामाजिक उपक्रमास मदत केलेली आहे. |
| ३) | सरपंच यांनी चांगले सूचविले की गावात सौर उर्जेवर पथदिवे योजना करायला हवी. तशी माझी पण मागणी आहे. त्यासाठी नियोजन करण्यात यावे. | याबाबत ग्रामपंचायतीने प्रस्ताव सादर करावा व त्याबाबत निश्चित पुढील कार्यवाही करण्यात येईल. |

१५)**श्री नागुराव शंकरराव कौडगावे, राहणार-पांढरपौनी, तालुका -राजुरा, जिल्हा-चंद्रपूरः-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | बाजूला लागलेली शेती ही माझी आहे. माझ्याकडे दोन एकर ऊस होता. त्या ऊसापासून दोन वर्षे रसवंती चालविली, त्यावेळी कंपनी ही बंद होती. सुमारे ६-७ लाख रुपये वर्षाचे उत्पन्न होते. गेल्या वर्षी ऊस घेतला. तो पूर्णपणे काळा येतो. नुकसान भरपाई म्हणजे लहान मुल रडू नये, एवढीच देतात. आता रोडवरुन गाडी गेली की कंपनीची धूळ उडते व शेतातील पीकांवर पडते. एका बाजूला कंपनी, दुस-या बाजूला रस्ता व तिसऱ्या बाजूला कंपनीचा नवीन प्रकल्पात माझी शेती आहे. येथे मजूरांना, स्थानिकांना रोजगार मिळेल असे सांगतात, पण शेतकरी देशोधडीला लागेल. येथे रोजगार, मजूराल काम याबाबत मुद्दे उपस्थित झाले, पण शेतकऱ्यांना बाबतीत काहीही नाही. | सूचनेची नोंद घेण्यात आली.<br>प्रकल्प प्रवर्तक यांनी फॉगर लावण्याचे मान्य केलेले आहे. |
| २) | ५-६ वर्षांपूर्वी कापूस काळा आलेला होता. जिल्हा प्रशासन अधिकारी यांनी भेटी दिल्या. यावेळी ऊस काळा म्हणून भाव नाही, तो मोडून टाकून दिला. तरी मला योग्यप्रकारे नुकसान भरपाई देण्यात यावी, नाही तर आत्महत्या करण्याशिवाय मला कोणताही उपाय नाही. शासकीय अधिकारी यांनी आता माझ्या बरोबर आले, तर मी सद्यस्थिती दाखवू शकतो. शेतात टमोटे लावले, तर काळे, जांभळे लावले तरी काळे, ऊस लावला तरी काळे. भाजीपाला लावला, तो काळा, तो फेकून दिला, बैलाल दिला, तर बैल खात नाही. | कंपनीने फॉगर त्वरित लावण्याचे मान्य केलेले असून कंपनीने वेळोवेळी नुकसान भरपाई रक्कम अदा केलेली आहे. |
| ३) | आज या रस्त्याला लागून कंपनीस परवानगी देण्यात आलेली आहे. त्यामुळे धुळ रस्त्यावर पडते. लोक दुचाकी वाहनांवरुन खाली पडतात. गाडी चालविताना पुढील काहीही दिसत नाही. त्यामुळे रस्त्यावरुन जाणाऱ्या दुचाकी, चार चाकी ह्या गाड्या शेतात येतात. | कंपनीने वरिलप्रमाणे फॉगर लावण्याचे मान्य केलेले आहे. |

१६) **श्री संदीप भीवसन गायकवाड, राहणार-पांढरपौनी, तालुका-राजुरा, जिल्हा-चंद्रपूर:-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | जनसुनावणीत प्रकल्पामुळे फायदा व तोटा यावर चर्चा होतच असते. मात्र प्रकल्पात अधिकारी व कर्मचाऱ्यांची आवश्यकता असेल तर ते स्थानिकच घेण्यात यावे. यासाठी आम्ही काही दिवसांपूर्वी हरताळ केलेला होता. आमच्या मुठरा गाव शिक्षित असून या लहान गावातून ४-५ क्लास वन अधिकारी झालेले आहेत, तसेच पांढरकवणी गावातून एम.बी.बी.एस. डॉक्टर झालेले आहेत. स्थानिकांना डावलून आम्ही परराज्यातील लोकांना येऊ देणार नाही. | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की प्रकल्पग्रस्त व स्थानिकांना प्रकल्पात रोजगाराची संधी देण्यात येईल. त्यासाठी प्रकल्प बांधकाम टप्प्यात व प्रकल्प पूर्ण झाल्यांनंतर कार्यान्वित करण्यासाठी पुढील दीड-दोन वर्षांसाठी लागणाऱ्या कुशल, अर्धकुशल आणि अकुशल संवर्गात रोजगार स्थानिकांना देण्यासाठी आजूबाजूच्या गावातील सरपंचांना पत्रे पाठविण्यात आलेली आहेत. त्याशिवाय एखाद्या स्थानिकांना उपरोक्त संवर्गात जर रोजगार हवा असल्यास सरपंचाचे पत्र आणल्यास त्यांची मुलाखात घेण्यात येईल. सीएसआर निधी प्रकल्पग्रस्त गावातील नागरी सुविधा पुरवण्यासाठी उपलब्ध करण्यात येईल, |
| २) | येथील गावात सुशिक्षित बेरोजगारांची संख्या प्रचंड प्रमाणात आहे. त्यासाठी प्रकल्पांची आवश्यकता आहे. मात्र प्रकल्पाने मागच्या बाजूच्या अमल नाल्यावर जर बंधारा बांधला, तर त्यामुळे येथील पाण्याची पातळी वाढेल. त्यावरच आमची शेती पिकविली जाते. जर पाणी सोडले नाही, तर तो कोरडा पडतो. नाला खोलीकरण करण्याची परवानगी देण्यात यावी, त्याचप्रमाणे पांदण रस्ते तयार करण्याची परवानगी देण्यात यावी. अन्यथा तो शासनाने त्वरित करावा. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| ३) | प्रकल्प परिसरातील गावात बरेच मुले ही युपीएससी, एमपीएससीची तयारी करत आहेत. त्यांना दत्तक घेऊन जर त्यांची फी जर भरली, तर त्या शेतकऱ्यांच्या मुलाला मदत होईल. त्यांना शैक्षणिक साहित्य पुरविण्यात यावे. जर प्रकल्पाचे प्रदूषण प्रकल्प परिसरातील लोक सहन करत आहेत, तर त्यांना मदत करावी. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| ४) | मुठरा गावात वाहनचालक व गाड्यांची संख्या भरपूर आहेत. तरी प्रकल्पात त्यांनी संधी, कंत्राटी कामे देण्यात यावी. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

**१७)<u>सौ. पार्वताबाई बी. आत्राम, माजी सरपंच, पांढरपौनी, तालुका-राजुरा, जिल्हा-चंद्रपूर:-</u>**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | माझे शेत मुठरा शिवारात आहे. सर्व भाजीपाला काळा होतो. सकाळी शेतात गेल्यास पूर्णपणे काळे होते. कंपनी अधिकारी हे रस्त्यावर पूर्णपणे पाणी टाकत नाही. नुकसान भरपाई ही दहा हजाराच्यापेक्षा जास्त देत नाहीत. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

**१८)<u>श्री गौतम पासलकर,</u>**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | या प्रकल्पामुळे आसपासच्या गावाला जे नुकसान होत आहे, शेतावर सगळे काळे थर पडलेले आहेत, रेल्वे उभी राहिली की मेडिकल व्हॅन, शाळेची बस यांनाही बराच वेळ थांबावे लागते. मागच्या ४-५ वर्षांपूर्वी आम्ही सदरहू प्रकल्पास विरोध केलेला होता. त्यावेळेस मोबदल्याची माहिती करण्यात आलेली होती. आता मोबदला दिला की नाही हे माहित नाही. हे शेतकरी दुबळे आहेत. यांना पहिला मोबदला देण्यात यावा. | प्रकल्प प्रवर्तकांनी फॉगर त्वरित लावण्याचे आश्वासन दिलेले आहे. |
| २) | दुसरा मुद्दा परवानगी पाण्याजवळ देऊ नये. कारण पाण्यात कंपनीची काळी पावडर मिसळून सर्व पाण्याचे स्त्रोत खराब होतील. जनावरांनासुध्दा विविध आजार झालेले आहेत, कारण त्यांच्या चाऱ्यावर काळी डस्ट पडते. पर्यावरण विभाग, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने याची नोंद घ्यावी. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| ३) | त्याचप्रमाणे या कंपनीच्या काळ्या डस्टमुळे स्थानिकांमध्ये खोकला, विविध आजार झालेले | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | आहेत, त्यांना मोफत औषधोपचार पुरविण्यात यावेत. त्याचप्रमाणे या डस्टमुळे ज्यांना मोठे आजार झालेले आहेत, त्यांना नागपूरला नेऊन त्याचा सर्व खर्च करण्यात यावा. मी परत विनंती करतो की कुठल्याही पाण्याच्या स्त्रोताजवळ प्रकल्पास मान्यता देण्यात येऊ नये. मागच्या जनसुनावणीत हे मुद्दे उपस्थित करण्यात आलेले होते | |
| ४) | स्थानिकांना, प्रकल्पग्रस्तांना रोजगाराची संधी मिळालीच पाहिजे. आता होकार देतात, नंतर काहीही देत नाहीत. रोजगार देण्याचे अभिवचन हे लेखी स्वरुपात देण्यात यावे. प्रकल्पग्रस्त व स्थानिकांना शिक्षण सुविधा व औषधोपचार हे मुफ्त देण्यात यावेत. | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की प्रकल्पात स्थानिकांनाच प्राधान्य देण्यात येते. |

१९) **श्री विजय ठाकरे, राहणार-गडचांदुर, तालुका- गडचांदुर, जिल्हा-चंद्रपूर, अध्यक्ष, सन्मित्र ग्रामविकास सेवा संस्थाः-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | या कोल वॉशरी संदर्भात दिनांक ०४ ऑगस्ट, २०२२ रोजी आम्ही एक तक्रार अर्ज जिल्हाधिकारी यांना कंपनीतील वाहतुकीच्या संदर्भात तक्रार अर्ज सादर केलेला होता. प्रकल्पा पासून १०० मीटर अंतरावर आमचा जाण्यायेण्याचा मार्ग आहे. ४० टनांचा ट्रेलर येथे उभे राहतात. यावेळी उपस्थित श्री संदीप गायकवाड यांनी अक्षेप नोंदविला की पर्यावरण समितीने प्रकल्प परिसरातील बाधित गावांच्या समस्या ऐकाव्यात. जिल्ह्यातील समाजसेवकांच्या तक्रारी ऐकण्यात स्थानिकांना येथे वेळ नाही, त्यासाठी जिल्हाधिकारी यांनी वेगळी बैठक बोलवावी. त्यावेळी अध्यक्ष यांनी त्यांची तक्रार एक मिनिटात सांगण्याची विनंती केली. त्यावेळी श्री विजय ठाकरे यांनी सांगितले की रस्त्याच्या दोन्ही बाजूस ट्रक्स उभे राहतात, आंम्हाला दुसरा रस्ता नाही. मागून आलो तर | सूचनेची नोंद घेण्यात आली. कपंनी प्रशासन कंपनीत येणारे ट्रक्स एका बाजूस उभे करण्याच्या सूचना पाळण्यात येतील.<br>सदस्य यांनी ट्रक पार्कींगबाबत स्पष्टीकरण देण्याची सूचना केली. प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की हा राष्ट्रीय महामार्ग विकसित होणार आहे. प्रकल्पाची जागा जात आहे. त्यासाठी सीमा कुंपण (boundary wall) मागे घेण्यात येऊन पुढे ट्रक पार्किंग करण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | नाल्याच्य कडेला गाडी ठेवावी लागते. तर ट्रक्स दोन्हा बाजूस उभे राहू नये, आम्हांला जायला रस्ता देण्यात यावा. अम्हांला जायला रस्ता असावा. | |

२०)**श्री किशोर निब्रड, रा. मुठरा, तालुका राजूरा, जिल्हा चंद्रपूर:-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कोल वॉशरीला जागा शेतकरी देतात. बऱ्याच कंपन्या सुरु करण्यात आल्या. नंतर बंद झाल्या. त्या शेतकऱ्यांच्या नोकऱ्या गेल्या. मुलाला नोकरी देणार म्हणून कंपनीला जमिनी दिल्या. जमिनीपण गेल्या. नोक-या गेल्या, कंपन्यासुध्दा बंद आहेत. हा फार मोठा सामाजिक प्रश्न आहे. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

२१)**श्री विठ्ठलराव करमणकर, माजी सरपंच, मुठरा, तालुका-राजुरा, जिल्हा-चंद्रपूर:-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | ही कंपनी येणार, ही आमच्या गावाला एक सुवर्णसंधी आहे. प्रकल्पातील रोजगार हा स्थानिकांना, माझ्या गावातील तरुण तरुणींना रोजगार देण्यात यावा. आमच्या गावातील विविध सामाजीक उपक्रमांना कंपनीने प्रतिसाद द्यावा. | सूचनेचे स्वागत करण्यात आले. |

समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की बैठकीत विविध मुद्दे उपस्थित करण्यात आले. त्यात स्थानिकांना रोजगार, प्रकल्पातील डस्टमुळे विशेषतः शेजारील शेतातील पीकांचे नुकसान, रेल्वे सायडींगला रेल्वे बराच वेळ लोड करण्यासाठी थांबत असल्याने स्थानिक लोक, शाळेची बस, रुग्णवाहिका यांना विनाकारण बराच वेळ जाण्यासाठी लागणारा वेळ, स्मशानभूमीत शेड उभारणे, गावातील हनुमान मंदिरासाठी मदत हे मुद्दे उपस्थित झाले. त्यांनी प्रकल्प प्रवर्तक यांना वरिल सर्व मुद्दयांवर स्पष्टीकरण देण्याची सूचना केली.

२२)<u>श्री रमेश पवार, पांढरपौनी, तालुका-राजुरा जिल्हा-चंदपूरः-</u>

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | कंपनी उभारतात हे चांगले आहे. आमच्या पांढरपौनी गावात बेरोजगारांची संख्या बऱ्याच प्रमाणात आहे. येथे सुशिक्षित बेरोजगार आहेत. त्यांनी सर्वांना काम मिळेल. त्यासाठी कंपनीस परवानगी देण्यास हरकत नाही. | सूचनेचे स्वागत करण्यात आले. |
| २) | कंपनीनेही डस्ट प्रदूषण होऊ नये म्हणून कंपनीने पाणी मारावे. कंपनीने स्थानिक युवक युवतींना काम द्यावे. कंपनीस परवानगी द्यावी. | सूचनेची नोंद घेण्यात यावी. |

प्रकल्प प्रवर्तकांनी त्यांचे नांव कुशल गुप्ता सांगितले. त्यांनी प्रत्येक प्रश्नांवर उत्तर देण्यास सुरवात केली. त्यांनी सांगितले की कंपनीने सीएसआर आणि सीईआर निधीतंर्गत कुठल्या कामांचे नियोजन केलेले आहे याची माहीत ते देत आहेत-

१) प्रकल्प बांधकाम टप्प्यात व प्रकल्प पूर्ण झाल्यांनंतर कार्यान्वित करण्यासाठी पुढील दीड-दोन वर्षांसाठी लागणा-या कुशल, अर्धकुशल आणि अकुशल संवर्गात रोजगार स्थानिकांना देण्यासाठी आजूबाजूच्या गावातील सरपंचांना पत्रे पाठविण्यात आलेली आहेत. त्याशिवाय एखाद्या स्थानिकांना उपरोक्त संवर्गात जर रोजगार हवा असल्यास सरपंचाचे पत्र आणल्यास त्यांची मुलाकात घेण्यात येईल.

२) कंपनीच्या मागच्या बाजूस रेल्वे साईडिंग आहे. ते भारत सरकारच्या मध्य रेल्वेच्या अंतर्गत येते. तेथे विविध कंपन्या आपला माल लोड करतात. आता WCL ने त्यांचा माल लोड करण्यास सुरवात केलेली आहे. कंपनीची लोडिंग ही WCL च्या लोडिंगच्या ५%-१०% सुध्दा नाही. म्हणजे WCL च्या जर ५० रॅक्स असतील, तर आमच्या कंपनीच्या पाच रॅक्स असतात. रेल्वे साईडिंगच्या येथे ग्रामस्थांना त्या बाजूस जाण्यासाठी जी अडचण येत आहे, त्यासाठी आम्ही अनेकवेळा मध्य रेल्वेशी पत्रव्यवहार केलेला आहे. मात्र त्यांच्याकडून कोणताच प्रतिसाद नाही.

३) **यावेळी श्री जितेंद्र बाबूराव जिवणे, पोलिस पाटील** यांनी आक्षेप नोंदविला की WCL चा या सायडींगशी कोणाताच संबंध नाही. कारण WCL ची स्वतंत्र सायडींग आहे. प्रकल्प प्रवर्तक हे चुकीची माहिती देत आहेत.

४) त्यावेळी प्रकल्प प्रवर्तक श्री कुशल गुप्ता यांनी सांगितले की PRPL कोड उपलब्ध असतो, तेथे दोन प्लॅटफॉर्म उपलब्ध असतात. एकावरुन WCL, तर दुस-या प्लॅटफॉर्मवरुन इतर कंपन्यांना लोड करण्यासाठी ठेवलेला आहे.

यावेळी सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनाणी समिती यांनी गेट बंद असते त्याबाबत स्पष्टीकरण देण्याची सूचना केली. त्यावेळी प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की रेल्वे जर दोन-दोन तास उभी राहिली तर आमचेसुध्दा नुकसान आहे. आम्ही दक्षिण-मध्य रेल्वेला सिकंदराबादलासुध्दा पत्रव्यवहार केला. त्यालासुध्दा रेल्वेकडून प्रतिसाद नाही. यावेळी समन्वयक यांनी मत मांडले की ज्यावेळी शाळेच्या,कार्यालयीन वेळा जेव्हा असतील, त्यावेळी तेथे रेल्वे उभी राहू नये. प्रकल्प प्रवर्तक यांनी पुढे सांगितले की दक्षिण-मध्य रेल्वे सिकंदराबाद येथून रॅक उपलब्ध झाल्यानंतर ते पुरवितात. वेळ सांगत नाहीत.

सदस्य यांनी येथे मत मांडले की गावकऱ्यांचा हा प्रश्न सोडविलाच पाहिजे. त्यांचे निवेदन घेऊन त्यांच्यासोबत रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना भेटण्यात यावे. त्यावेळी काही उपस्थितांना सूचना केली की कंपनीच्या लगत पक्का रस्ता करण्याचे आश्वासन कंपनीने दिलेले होते, ते पुर्ण करण्यात यावे. काही स्थानिकांनी गावकऱ्यांनी ना हरकत प्रमाणपत्र दिल्यास रेल्वे लाईनच्या खालून किंवा वरुन रस्ता देण्यास तयार होते, मात्र काही गावकऱ्यांनी दोन्हा रस्ते (वरुन व खालून) बांधण्याची मागणी केल्याने ग्रामपंचायतीने ना हरकत प्रमाणपत्र दिलेले नाही.

५) प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की शेतीचे नुकसानीबाबतच्या मोबदल्याबाबत मुद्दा उपस्थित करण्यात आलेला होता. त्यावेळी सदस्य यांनी पांढरपौनी येथील शेतकरी श्री नागुराव शंकरराव कौडगावे, राहणार-पांढरपौनी यांनी बैठकीत मागणी केल्याचा उल्लेख केला. त्यावेळी प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की आम्ही दरवर्षी नुकसान भरपाई देतो. त्यांनी त्याची प्रत उपलब्ध करुन दिली. श्री नागुराव शंकरराव कौडगावे यांनी सांगितले की दरवर्षी ८०,०००/- नुकसानभरपाई देतात, पण दरवर्षी ७-८ लाखांचे नुकसान होते. त्यावेळी इतर उपस्थित व श्री कौडगावे यांनी सांगितले की रस्त्याची नुकसान भरपाई ही पंचवीस लाख मिळाली, येथे ७-८ लाखांचे दरवर्षी नुकसान होऊनही फक्त ८०,०००/- नुकसानभरपाई. त्यावेळी प्रकल्प प्रवर्तक यांनी जमिन कायमची जाते म्हणून नुकसानभरपाई मिळाली, ती पीकांसाठी कशी देण्यात येईल? मात्र त्याबाबत कंपनीस पत्र सादर करावे, निश्चितच मार्ग काढण्यात येईल.

येथे अध्यक्ष यांनी मत मांडले की नुकसानभरपाई ही वाढविली पाहिजे. एकच ठेवता येणार नाही. सदस्य यांनी संबंधित प्रकल्पग्रस्तांची बैठक त्वरित बोलावून तोडगा काढण्यास सांगितले.

६) प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की स्मशान घाटावर शेड बांधण्याची मागणी करण्यात आली. ती निश्चितच पुरविण्यात येईल.

७) कंपनीत लोडर उपलब्ध असतात. ते वेळोवेळी पुरविण्यात येतात. त्याबाबत पत्रे उपलब्ध आहेत.

८) रेल्वे साईडिंगला रॅक लोडिंगच्यामुळे जो काही त्रास होतो, त्यासाठी तेथे हरित पट्टा विकसित करण्यात येईल, ज्यामुळे आसपासच्या शेतीचे नुकसान होई नये.

९) समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की रेल्वे साईडिंगला डस्ट प्रदूषणाविषयी ज्या तक्रारी येत आहेत, तर त्यासाठी Mist Type Fogger का लावत नाही अशी विचारणा केली. समन्वयक यांनी सांगितले की Mist Type Fogger हा movable, truck mounted, tractor mounted उपलब्ध असतो. समन्वयक यांनी Mist Type Fogger रत्यावरही transportation issue असल्याने व रेल्वे साईडिंगला लावण्याची सूचना केली. प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की त्याबाबत त्वरित पुढील कार्यवाही करण्यात येईल.

१०) प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की dry washing unit जर wet washing मध्ये बदल केल्यास प्रदूषण आपोआपच कमी होईल.

११) सौर ऊर्जा सयंत्रे हे निश्चितच पुरविण्यात येईल. त्यावेळी श्री नंदकिशोर सुभाष वाडे, सरपंच, ग्रामपंचायत कळमना, तालुका- राजुरा, जिल्हा - चंद्रपूर यांनी सांगितले की सौर उर्जेचे पॅनल लावून वीज गावाला द्यायची आहे. त्यावेळी प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की गावाची जी गरज आहे, त्याचे पत्र आल्यास त्याबाबत निश्चितच विचार करण्यात येईल.

१२) सादरीकरणात सांगितल्यानुसार प्रकल्पात ५०-६० कुशल कामगार लागतील. ते स्थानिक घेण्यात येतील. त्याचप्रमाणे अकुशल संवर्गातही स्थानिकांनाच संधी देण्यात येईल.

१३) प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की कॉक्रीट रस्ता तयार करण्यात येईल. कंपनी नुसती आश्वासन देत नाही, कारण आमच्याकडे सर्व पुरावे आहेत.

१४) सदस्य यांनी ट्रक पार्कींगबाबत स्पष्टीकरण देण्याची सूचना केली. प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की हा राष्ट्रीय महामार्ग विकसित होणार आहे. प्रकल्पाची जागा जात आहे. त्यासाठी सीमा कुंपण (boundary wall) मागे घेण्यात येऊन पुढे ट्रक पार्किंग करण्यात येईल.

१५) प्रकल्प प्रवर्तकांनी स्थानिक युवक-युवतींची कुशल, अकुशल यांची यादी सादर करण्याची सूचना केली.

अध्यक्ष यांनी सूचना केली की प्रत्येक गावाने त्या त्या गावाची यादी कंपनीस सादर करावी.

१६) प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की सदरहू प्रल्पात सांडपाण्याचा पुनर्वापर करण्यात येणार आहे. त्यामुळे नाल्यात पाणी जाणार नाही. आताही जात नाही.

१७) मागच्या वर्षी खामोना गावाने मागणी केल्यामुळे तेथे आरोग्यशिबिर आयोजित करण्यात आलेले होते. त्यांनी सांगितले की दर तीन महिन्याने वैदकीय शिबिर आयोजित करण्याचे प्रयोजन आहे.

१८) ग्रामपंचायतकडून जी मागणी होईल, त्याचा निश्चितच विचार करण्यात येईल.

**श्री राजेश बेले** यांनी मागणी केली की प्रकल्पातील डस्टमुळे लहान मुलांना त्रास होतो, तर लहान मुलांचे आरोग्यशिबिर आयोजित करणे ही आपली जबाबदारी आहे. तरी दरवर्षी लहान मुलांचे आरोग्यशिबिर (Child Medical Camp) किती घेण्यात येतील?

त्यावेळी प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की वैद्यकीय शिबिरात बालरोग तज्ज्ञांना बोलविण्यात येईल. अध्यक्ष यांनी सुचना केली की जेवढी प्रकल्पबाधित गावे आहेत, त्यांच्याशी संपर्क साधून वैदकीय शिबिरे अयोजित करण्यात यावीत.

अध्यक्ष यांनी बैठकीचा समारोप करताना सांगितले की आज आपण मे. एन. एन. ग्लोबल मरचेन्टाईल प्रायव्हेट लिमिटेड, खसरा क्रं. १३१/२, १३१/३, १३१/४, मौजा मुठारा, तालुका-राजुरा, जिल्हा-चंद्रपूर, महाराष्ट्र या प्रकल्पाच्या २.० एमटीपीए डिशल्ड कोल क्रशिंग प्रकल्पाचे २.० एमटीपीए वेट कोल वॉशरीच्या आधुनिकीकरणाच्या प्रकल्पाच्या पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीसाठी जमलो आहोत. बैठकीत अगोदरच सांगितल्याप्रमाणे सदरहू समिती ही उपस्थितांचे प्रस्तावित प्रकल्पाविषयीचे पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेप नोंदविण्यासाठी असून सदरहू समितीस प्रकल्पास मंजूरी देणे, नाकारणे वा शिफारस करण्याचा अधिकार नाही.

त्यांनी सांगितले की बैठकीत उपस्थितांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेपांची नोंद घेण्यात येऊन त्याचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येऊन ते अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, प्राप्त झालेल्या लेखी सूचना यांच्यासह मुख्यालय, म.प्र.नि.मंडळ यांच्या तर्फे पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांना सादर करण्यात येईल. तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते. सदरहू इतिवृत्ताची व व्हिडिओग्राफीची प्रत मागणी केल्यास स्थानिकांना उपलब्ध करुन देण्यात येईल.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी बैठकीतील सर्व स्थानिक जनता, प्रकल्पग्रस्त, शासकीय अधिकारी व कर्मचारी, पोलिस यंत्रणा, प्रकल्पाचे सर्व व्यवस्थापन यांचे आभार मानले व जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

मा. अध्यक्ष यांचे आभार मानून जनसुनावणी ही संस्थगित करण्यात आली.

प्राप्त झालेले २८ सूचना,आक्षेप सोबत जोडलेले आहेत.

| | | |
|---|---|---|
| **(अतुल सातफळे)** | **(अ. मा. करे)** | **(विशालकुमार मेश्राम)** |
| समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, चंद्रपूर | सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, चंद्रपूर | अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा अपर जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर |